बेस्ट उपक्रम

'बस वाहक' पदासाठी सरळसेवा भरती जाहिरात

बेस्ट उपक्रमामध्ये बस वाहक या पदासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक, सामाजिक आणि शैक्षणिदृष्टया दुबल घटक व अराखीव प्रवर्गातील उमेदवारांकडून रिक्त असलेली पदे भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत असून सदर अर्ज बेस्ट उपक्रमाच्या www.bestundertaking.com या संकेत स्थळावरील recruitment या शीर्षकाखाली दिलेल्या लिंक (Link) वर जाऊन भरता येतील. बस वाहक पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा कालावधी **दिनांक ०८.०७.२०२६ ते २९.०७.२०२६** राहिल.

१) बस वाहक पदासाठी भरण्यात येणारी एकूण पदे :-३६४

आरक्षित पदांची संख्या :-

अनुसूचित जाती (Scheduled Caste) - ३४
अनुसूचित जमाती (Scheduled Tribe) - २२
विमुक्त जाती (अ) (Vimukta Jaties) (A) - ०६
भटक्या जमाती (ब) Nomadic Tribe (B) - ०६
भटक्या जमाती (क) Nomadic Tribe (C) - १०
विशेष मागासप्रवर्ग (Special Backword class) - ०५
इत्तर मागासवर्गीय (Other Backword class) - ६७
आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (Economically Weaker Section) - ३६
सामाजिक आणि शैक्षणिदृष्टया दुर्बल घटक (Socially and Economically backward Class) - ३६
अराखीव (Open) – १४२

(नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र उमेदवारांने कागदपत्र पडताळणी वेळी सादर करणे आवश्यक (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून.)

२) शैक्षणिक व इतर आवश्यक अर्हता :- माध्यमिक शालांत परिक्षा (S.S.C) या तत्सम परीक्षा सरासरी किमान ५० टक्के वा अधिक गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच सदर परीक्षा वा उच्चतम परिक्षा किमान १०० / ५० गुणांचा मराठी विषय (निम्नस्तर किंवा उच्चस्तर) घेवून उत्तीर्ण झालेला असणे आवश्यक आहे.

प्रादेशिक परिवहन प्राधिकरण (RTA) महाराष्ट्र राज्य यांनी दिलेला व नुतनीकरण केलेला बसवाहक परवाना आणि बिल्ला (Badge) आवश्यक.

३) वयोमर्यादा :- दिनांक २९.०७.२०२६ रोजी खुल्या प्रवर्गातील **उमेदवारांसाठी १८वर्षे पूर्ण ते ३८ पेक्षा** जास्त नसावे तसेच **मागासवर्गीय उमेदवारांसाठी १८वर्षे पूर्ण ते ४३ पेक्षा** जास्त नसावे

४) शारिरीक अर्हता :- अ) उंची : किमान १५४ से. मी. असणे आवश्यक तसेच कमाल १७८ से. मी. पेक्षा जास्त नसावी.

ब) वजन किमान ४५ कि. ग्रॅ. असणे आवश्यक.

५) **वेतन श्रेणी व भत्ते** :- मुळ वेतन रुपये २२,०६०/- + महागाई भत्ता + घरभाडे भत्ता +वैद्यकीय भत्ता रुपये+ गणवेश धुलाई भत्ता तसेच रजेचे रोखीकरण, रजा प्रवास भत्ता, उपक्रमाच्या बस मधून मोफत प्रवास सुविधा (एकदरीत अंदाजे रु. ३६,०००/-)

६) **प्रतिक्षा यादीची कालमर्यादा** :- उपरोक्त निर्देशित अनुशेषाची पदे भरे पर्यंत अथवा कमाल दोन वर्षे कालमर्यादेपर्यंत (दोन वर्षाचा उक्त कालावधी संपल्यानंतर प्रतिक्षायादी बाद करण्यात येईल).

७) बस वाहक पदासाठी परिक्षा संगणक आधारीत बहुपर्यायी चाचणी (CBT) या प्रकाराची असेल. या परिक्षेमध्ये खालील विषयांचा समावेश असेल :-

१) अंकगणित
२) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी
३) भाषा ज्ञान (मराठी व इंग्रजी)

(प्रत्येक विषयाची बहुपर्यायी चाचणी ही १० गुणांची असेल. चाचणी परिक्षेत पात्र ठरण्यास वरिल प्रत्येक विषयामध्ये किमान ३ गुण आणि एकूण सरासरी १२ गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.)

८) **परीक्षा शुल्क** :- १) खुल्या प्रवर्गासाठी रुपये १०००/-
२) राखीव वर्गातील उमेदवारासाठी रुपये २००/-

उमेदवाराने अर्ज दाखल करताना भरणा केलेले भरती प्रक्रिया शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

९) निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती बदली तत्वावर 'बदली बस वाहक' म्हणून करण्यात येईल. बदली कालावधी समाप्तीनंतर समाधानकारक काम, वर्तणूक व उपस्थिती, सेवाभिलेख इत्यादीच्या अधीन राहून कायम स्वरुपी पदावर नियुक्ती केली जाईल.

सदर भरती प्रक्रिया काही कारणास्तव पूर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे सर्व अधिकार बेस्ट उपक्रम राखून ठेवत आहे. तसेच उमेदवारांची बस वाहक पदावर निवड करण्याचे सर्वस्वी अधिकार महाव्यवस्थापक बेस्ट उपक्रम / निवड अधिकारी यांना राहतील.

ठिकाण : मुंबई
दिनांक :

महाव्यवस्थापक

महत्वाच्या सुचना

सामान्यीकरण प्रक्रिया (Normalisation Method) :- अर्ज करण्या-या उमेदवारांची संख्या लक्षणीय असल्यास संगणक आधारित परिक्षा (CBT) एकापेक्षा जास्त सत्रात (Multiple Shifts) घेतली जाईल. वेगवेगळया संत्रामधील काठिण्य पातळामध्ये समतोल राखण्यासाठी ' Mean Standard Deviation Method' चा वापर करुन गुणांची सामान्यीकरण प्रक्रिया लागू करण्यात येईल. त्यासाठी **जोडपत्र 'ब'** मधील अधिकृत सूत्र (Formula) वापरण्यात येईल.

कठोर दंडात्मक व फौजदारी कारवाई (Anti – Malpractice Clause) :- भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची / खोटी माहिती देणे, तोतयेगिरी करणे, परिक्षा कक्षात किंवा बाहेर गैरवर्तन करणे अथवा यशिला लावण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी रदद करुन तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल व त्याला उपक्रमाच्या भविष्यातील सर्व भरतीसाठी कायमचे प्रतिबंधित (Debarred) केले जाईल.

नाव बदलाबाबतचे शासकीय प्रमाणपत्र :- विविहामुळे किंवा इतर कारणामुळे ज्या महिला / इतर उमेदवारांच्या मूळ नावात बदल झाला असेल, त्यांनी नावात बदल झाल्याबाबतचे शासकीय राजपत्र (Gazette) किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारी ग्राहय धरली जाणार नाही.

ओळखपत्राबाबत स्पष्टता (Valid Identity Proof) :- परिक्षा केंद्रावर उमेदवाराने प्रवेशपत्रासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, डायव्हिंग लायसन्स किंवा पासपोर्ट यांपैकीच एक वैध मूळ फोटो ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे. रेशन कार्ड आणि लर्निंग लायसन्य हे ओळखपत्राचा पुरावा म्हणून ग्राहय धरले जाणार नाही.

कागदपत्रांमधील विसंगती :- ऑनलाईल अर्जात भरलेली माहिती आणि प्रत्यक्षात पडताळणीच्या वेळी सादर केलेली मूळ कागदपत्रे यामध्ये काहीही फरक किंवा विसंगती आढळल्यास उमेदवारांची निवड तात्काळ रदद करण्यात येईल.

परिक्षा केंद्राबाबत अंतिम अधिकार :- उमेदवाराने मागणी केलेल्या परिक्षा केंद्राव्यतिरिक्त इतर कोणतेही केंद्र देण्याचा किंवा प्रशासकिय कारणास्तव केंद्र बदलण्याचा अतिंम अधिकार उपक्रमाकडे राखीव राहील.

Mean Standard Deviation Method

$$\hat{M}_{ij} = \frac{\bar{M}_t^g - M_q^g}{\bar{M}_{ti} - M_{iq}} \left(M_{ij} - M_{iq}\right) + M_q^{gm}$$

Where:

$\hat{M}_{ij}$ = Normalized marks of j^{th} candidate in the i^{th} shift.

$\bar{M}_t^g$ = is the average marks of the top 0.1% of the candidates considering all shifts (number of candidates will be rounded-up).

M_q^g = is the sum of mean and standard deviation marks of the candidates in the examination considering all shifts.

$\bar{M}_{ti}$ = is the average marks of the top 0.1% of the candidates in the i^{th} shift (number of candidates will be rounded -up).

M_{iq} = is the sum of mean marks and standard deviation of the i^{th} shift.

M_{ij} = is the actual marks of obtained by the j^{th} candidate in the i^{th} shift.

M_q^{gm} = is the sum of mean marks of candidates in the shift having maximum mean and standard deviation of marks of candidates in the examination considering all shifts.

Calculation of marks will be done up to 5 decimal places.